# बातमीपत्र
## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर
## माहिती कक्ष, दि २५ जुलै २०२३

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४९६/२०२३ भादवि ३०७,४५२,५०६(२),४२७,३३६,३४ सह भारतीय आर्म ॲक्ट कलम ४/२५ व महा पोलीस कायदा कलम १३५ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि २४/०७/२०२३ रोजी १५.०० वा चे सुमारास ४३,सिध्दार्थ नगर सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २५/०७/२०२३ रोजी ००.२५ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | अमर अशोक माने,वय-५० वर्षे,रा- ४३,सिध्दार्थ नगर सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) मुकेश ऊर्फ मुक्या किसनसिंग बोधीवाले,२) गंगाराम ऊर्फ गंग्या किसनसिंग बोधीवाले,रा- दोघे नळ बझार चौक लष्कर सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी व फिर्यादीचा भाऊ नितीन असे दोघे फिर्यादीचे घरी असताना फिर्यादीचे ओळखीचे वरील आरोपीत हे अचानक घरात घुसले व आरोपी क्र १ यांने तु पोलीस का खबरी है तु हमारे बारे मै पोलीसांको खबर देता क्या तुझे अब खल्लास करते असे म्हणून आरोपी क्र १ यांने त्याचे हातातील कोयत्याने फिर्यादीचे मानेवर वार करीत असताना तो फिर्यादीने चुकविला असता तो वार फिर्यादीचे खांदयावर लागला त्याच दरम्यान आरोपी क्र २ यांने त्याचे हातातील कोयत्याने फिर्यादीचे पोटावर उजव्या बाजूस वार केला त्यात फिर्यादी जखमी होवून खाली पडला असता फिर्यादीचा भाऊ नितीन आरडाओरडा करीत असताना त्यावेळेस त्या दोघांनी धक्काबुक्की करून ढकलून दिली त्यात आरोपी क्र २ यांने भावास कोयता उगारून तु बिच मे आया तो तुझे भी खल्लास करेगे अशी धमकी दिली त्याचवेळी घरातील सामान देखील फेकाफेकी करून दोघांनी घरातील सामानाची तोडफोड करून नुकसान केले आहे त्याच दरम्यान फिर्यादी हा कसाबसा जिव वाचवणेकरीता घराबाहेर आला असता आरोपी हे फिर्यादीचे मागे बाहेर आले आमचे गल्लीतील लोक फिर्यादीस सोडवण्यास येत असताना त्या दोघांनी फिर्यादीवर दगडफेक केली दगडफेकीमध्ये फिर्यादीचे तोंडास व अंगास मार लागला तेथे लोकांची गर्दी होत असल्याचे पाहून आरोपी क्र १ व २ हे तेथून पळून गेले आहेत. म्हणून. तपास:- दुपोनि धायतोडे- **९७६६०६७६०२** |

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४९६/२०२३ भादवि ३५३,३३२,५०६,३४, सह भारतीय आर्म ॲक्ट कलम ४/२५ व महा पोलीस कायदा कलम १३५ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि २४/०७/२०२३ रोजी १६.३० वा. चे सुमारास सदर बझार पोलीस ठाणे सोलापूर शहर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २४/०७/२०२३ रोजी २३.१६ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | पोसई सचिन औदुंबर माळी,नेम- सदर बझार पो.स्टे सोलापूर शहर |
| **आरोपीचे नाव** | : | १) मुकेश ऊर्फ मुक्या किसनसिंग बोधीवाले,२) गंगाराम ऊर्फ गंग्या किसनसिंग बोधीवाले,रा- दोघे नळ बझार चौक लष्कर सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे कर्तव्यावर असताना यातील वरील आरोपी मजकूर हे पोलीस ठाणेस येवून अमर माने हा पोलीसांचा बातमीदार आहे त्याचे विरूध्द आमची तक्रार घ्या असे म्हणत आरोपी क्र १ यांने त्याचेकडील ब्लेड काढून स्वत:चे डावे हातावर वार करून जखमी होवून परत त्याचेकडील सत्तूर फिरवून आम्हा पोलीसांना धमकावून त्या सत्तूरचे पाठीमागील मुठीने फिर्यादीचे उजवे हातावर मारून दुखापत केली तसेच त्याचा साथीदार आरोपी क्र २ यांने फिर्यादीचे सोबतचे पोलीस स्टाफला धक्काबुकी करून पोना/सरतापे यांचे छातीत जोरात पंच मारले त्यात ते खाली पडून त्याचे पाठीस मुक्का मार लागला तसेच टेबलवरील शासकीय दस्ताऐवज अस्ताव्यस्थ फेकून शासकीय कामात अडथळा केला आहे म्हणून. तपास:- सपोनि मुल्ला- **८१०८०१९१००** |